**प्रकल्प प्रवर्तक श्रीमती दिपाली गोपाळ गुंडावार यांच्या अडेगांव लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ७९५, अडेगांव, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र यांच्या वाढीव उत्पादन क्षमता ५९४७१२-६००००० टन/वर्ष (डोलोमाईट-४५४४६० टन/वर्ष + लाईमस्टोन-१४०२५२ टन/वर्ष) ते १२००००० टन/वर्ष (डोलोमाईट-८४०००० टन/वर्ष + लाईमस्टोन-३६०००० टन/वर्ष) व प्रकल्प क्षेत्र ३०.० हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २२/०६/२०२२ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, श्रीमती दिपाली गोपाळ गुंडावार यांच्या अडेगांव लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ७९५, अडेगांव, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र |

**प्रस्तावना:-**

मे प्रकल्प प्रवर्तक श्रीमती दिपाली गोपाळ गुंडावार यांच्या अडेगांव लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ७९५, अडेगांव, तालुका-झरी झामणी, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र यांच्या वाढीव उत्पादन क्षमता ५९४७१२-६००००० टन/वर्ष (डोलोमाईट-४५४४६० टन/वर्ष + लाईमस्टोन-१४०२५२ टन/वर्ष) ते १२००००० टन/वर्ष (डोलोमाईट-८४०००० टन/वर्ष + लाईमस्टोन-३६०००० टन/वर्ष) व प्रकल्प क्षेत्र ३०.० हेक्टर प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयातील राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाने (SEIAA) यांनी दिनांक ०७/०१/२०२१ रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास टीओआर साठी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग बी-1 मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे प्रकल्प प्रवर्तक श्रीमती दिपाली गोपाळ गुंडावार यांच्या अडेगांव लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ७९५, अडेगांव, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २२/०३/२०२२ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २२ जून, २०२२ रोजी प्रत्यक्ष (physical)

पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र पुण्यनगरी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १९/०५/२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर
२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, 15वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
३) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई – ४०० ०२२
४) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर,
५) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर
६) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ,
८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ,
९) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, वणी, तालुका – वणी, जिल्हा- यवतमाळ,
१०) मुख्य अधिकारी, नगर पंचायत, झरीजामणी, तालुका - झरीजामणी, जिल्हा- यवतमाळ,
११) तहसीलदार, तहसील कार्यालय, वणी, तालुका-वणी, जिल्हा- यवतमाळ,
१२) तहसीलदार, तहसील कार्यालय, झरीजामणी, तालुका- झरीजामणी, जिल्हा- यवतमाळ,
१३) पंचायत समिती कार्यालय, झरीजामणी, तालुका- झरीजामणी, जिल्हा- यवतमाळ,
१४) ग्रामपंचायत कार्यालय, तेजापूर, तालुका- वणी, जिल्हा- यवतमाळ,
१५) ग्रामपंचायत कार्यालय, आमलोण, तालुका- वणी, जिल्हा- यवतमाळ,
१६) ग्रामपंचायत कार्यालय, चिलई, तालुका- झरीजामणी, जिल्हा- यवतमाळ,

१७) ग्रामपंचायत कार्यालय, गणेशपर,, तालुका- झरीजामणी, जिल्हा- यवतमाळ,
१८) ग्रामपंचायत कार्यालय, मुकुटबन, तालुका- झरीजामणी, जिल्हा- यवतमाळ
१९) ग्रामपंचायत कार्यालय, पिंपराड, तालुका- झरीजामणी, जिल्हा- यवतमाळ
२०) ग्रामपंचायत कार्यालय, खातेरा, तालुका- झरीजामणी, जिल्हा- यवतमाळ
२१) ग्रामपंचायत कार्यालय, येरड, तालुका- झरीजामणी, जिल्हा-यवतमाळ
२२) ग्रामपंचायत कार्यालय, अडेगाव, तालुका- झरीजामणी, जिल्हा-यवतमाळ

वरिल अनुक्रमांक ०६ ते २२ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३३/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२२०५३०-एफटीएस-०२६४ दिनांक ३०/०५/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **आयोजक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ११ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्त:-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री ललितकुमार वराडे, अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री गिरीश जोशी,तहसीलदार, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ, श्री शिरिष नाईक, जिल्हा खनिज अधिकारी - यवतमाळ, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती

- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

१) **श्री दिनकर बाबूराव पानघाटे, राहणार-अडेगांव, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | १९९८ पासून हा प्रकल्प कार्यान्वित असून पर्यावरण संरक्षणाबाबत कोणतीही उपाययोजना ह्या प्रकल्पाने केलेली नाही. | सादरीकरणात डस्ट पोल्युशन कंट्रोल प्लॅन दाखविलेला आहे. आम्ही स्प्रिंकलर्स, वॉटर टँक वाढविणार आहोत. आम्ही रू. ११,५०,०००/- राखीव निधी हरित पट्टा विकासासाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे |
| २) | सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे प्रकल्प परिसरातील सर्व ग्रामपंचायतीस जनसुनावणी बैठक सूचना देण्यात आल्या, मात्र ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत सदरहू प्रकल्प येतो, त्या अडेगाव ग्रामपंचायतीस आगाऊ सूचना देण्यात आलेली नाही. गावात दवंडीही देण्यात आलेली नाही. | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की २१/०५/२०२२ रोजी सरपंचमॅडम यांना सूचना देण्यात आलेली असून त्याची पोच मप्रनि मंडळ कार्यालयात आहे. आयोजक यांनी सांगितले की जनजागृती, दवंडी ह्या बाबी ग्रामपंचायत कार्यालयाने करण्याची सूचना देण्यात येतात. |

| | | |
|---|---|---|
| ३) | प्रकल्प प्रवर्तक खाणीपासून करोडो रुपये मिळविता, पण ग्रामपंचायतीस किती कर दिला, ग्रामपंचायत परिसरात किती सामाजीक उपक्रम राबविले तर काहीही केलेले नाही. या प्रकल्पामुळे आमचा गाव कोंडीत सापडलेला आहे, समस्या वाढल्या आहेत. स्थानिक शेतक-यांनी तारांगण उरलेले नाही. कंपनीची लीज ही आमच्या वस्तीपर्यंत आहे. ब्लास्टींगचा त्रास वस्तीतील नागरिकांना होईल. | प्रकल्पात कंट्रोल डिले ब्लास्टींगच करण्यात येईल. त्यासाठी डिले डिटोनेटरचा वापर करण्यात येऊन अगदी मिलीसेकंदाचा फरक पडेल, ज्यामुळे कंपने/व्हायब्रेशन जाणार नाहीत. कंपने/व्हायब्रेशन तपासण्यासाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्यात येईल |
| ४) | श्री पानघाटे यांनी सांगितले की उत्पादन वाढीसाठी आमचे काहीही आक्षेप नाही. मात्र पर्यावरण संरक्षण व ज्या गावात ही लीज(खाण) आहे, त्या गावाच्या विकासासाठी, रस्त्यासाठी, शैक्षणिक सुविधांसाठी प्रकल्पाने भरीव मदत केलेली नाही. तरी शासनास विनंती आहे की सदरहू प्रकल्पाची लीज कालावधी कमी करण्यात यावा व गावातील जनावरांना चरण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. येथे ई क्लासमुळे नवीन घरे बांधता येत नाही. तरी निवासी क्षेत्रापासून अंतर ठेवून यांची लीज ठेवण्यात यावी. प्रकल्प व्यवस्थापकांना सक्तीने स्थानिकांनाच काम देण्याची सूचना द्यावी. गावाला विकास निधी, तसेच ग्रामपंचायत कर देण्यात यावा अशी सर्व ग्रामस्थांतर्फे विनंती. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प व्यवस्थापन लीज वाढवतही नाही व कमी करत नाही. अस्तित्वात असलेल्या क्षेत्रावरच उत्पादन क्षमता वाढविणार आहोत. |
| ५) | त्यांनी सांगितले की परिसरात जनावर चा-याचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यादृष्टीने या लीजची जागा निश्ति करण्यात यावी व कालावधी कमी करण्यात यावा. या प्रकल्पातील धुळीमुळे आजूबाजूच्या शेतीचे अतोनात नुकसान होत आहे. त्या धुळीच्या नुकसानीचा मोबदला शेतक-यांना योग्य भावाने दिला जात नाही. येथील शेतकरी अत्यंत गरीब आहे. तरी या मुददयावरही प्रशासनाने न्याय द्यावा ही विनंती. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की शेतीच्या नुकसान भरपाईचा विषय आहे. तर उत्पादनात वाढ होणार असल्याने मोबदल्यातही वाढ करण्याचा कंपनी प्रशासनाचा मानस आहे.<br>पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की . सादरीकरणात डस्ट पोल्युशन कंट्रोल प्लॅन दाखविलेला आहे. आम्ही स्प्रिंकलर्स, वॉटर टँक वाढविणार आहोत. आम्ही रू. ११,५०,०००/- राखीव निधी हरित पट्टा विकासासाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस व गावात झाडे लावण्याचा प्रस्ताव आहे. २३०० झाडे लावण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| ६) | तसेच सदरहू कंपन्यानी वडकी - अडेगाव हा रस्ता सिमेंटचा करुन द्यावा. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री पानघडे यांनी कंपनीने वडकी - अडेगाव हा रस्ता सिमेंटचा करुन देण्याची मागणी केलेली आहे. तर कच्चा रस्ता तयार करुन देण्यात येईल, मात्र पक्का रस्ता विकसित करण्याचा विचार जिल्हा प्रशासनाने जिल्हा खनिज निधीतून करावा, कारण आमची उत्पादनवाढ हे सिमेंटचा रस्ता विकसित करण्याऐवढी नाही. मात्र त्यास सहकार्य निश्चितच प्रकल्प करेल. |

## २) <u>श्री संदीप आसुदकर, राहणार-अडेगांव, तालुका- झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-</u>

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात उत्पन्न होत असलेल्या राखेचे मोठमोठे ढिगारे तयार केले जातात. तो वा-याने एवढा उडतो की परिसरातील जनतेस त्याचा प्रचंड त्रास होत आहे. ब-याच रहिवाशांना श्वसनाचे गंभीर आजार झालेले आहेत. त्याचप्रमाणे विविध रोग होत आहेत. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री संदीप आसोदकर यांनी डस्ट प्रदूषणाबाबत प्रश्न विचारला. सादरीकरणात डस्ट पोल्युशन कंट्रोल प्लॅन दाखविलेला आहे. आम्ही स्प्रिंकलर्स, वॉटर टँक वाढविणार आहोत. आम्ही रू. ११,५०,०००/- राखीव निधी हरित पट्टा विकासासाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस व गावात झाडे लावण्याचा प्रस्ताव आहे. २३०० झाडे लावण्यात येतील. |
| २) | रस्त्यावरुन जाणा-येणा-यांना त्या राखेचा त्रास होतो. अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. बरेच लोक दगावले, काही लोक राखेमुळे पडून जखमी झाले. त्याची जबाबदारी कंपनी घेत नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | सादरीकरणात प्रकल्पाकडून मत्स्य व्यवसायासाठी प्रोत्साहन व मदत केली जाईल असे सांगण्यात आले. परिसरातील भोई समाज मत्स्यव्यवसाय करत असे. परिसरात दोन तलाव आहेत. त्या सोसायट्या बंद झालेल्या आहेत. विश्वासात घेऊन प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक मत्स्य व्यवसायास प्रोत्साहन दिलेलेच नाही. खाणीमुळे जे खड्डे तयार झालेले आहेत, तेथे मत्स्व्यवसाय करता | श्री आसोदकर यांनी भोई समाजासाठी जो प्रश्न विचारला, त्याबाबत उत्तर आहे की मत्स्यपालनासाठी अंदाजपत्रात तरतुद करण्यात येत आहे. जर खाणीतील खड्ड्यात मत्स्यपालन जर जमले नाही, तर गावातील तलावात त्यांना प्रोत्साहन करण्यात येईल. प्रकल्प व्यवस्थापन फक्त आर्थिक भार स्विकारेल, मात्र बाकी सर्व इतर प्रशासकीय बाबी या त्या भोई समाज सोसायटी यांनी करायच्या आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | येईल असे सादरीकरणात सांगण्यात आले. त्याबाबत प्रोत्साहन व पुढील कार्यवाही करण्यात यावी. | |
| ४) | गुरांना चाराच मिळत नाही. परिसरातील विविध उद्योग धंद्यांनी रस्त्यांच्या दोन्ही बाजूस झाडे लावलेली नाहीत. | रुपये ११,५०,०००/- राखीव निधी हरित पट्टा विकासासाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस व गावात झाडे लावण्याचा प्रस्ताव आहे. २३०० झाडे लावण्यात येतील. |
| ५) | प्रकल्पात स्थानिक लोक घेतात, पण त्यांचा मानसिक छळ करुन त्यांना नोकरीतून काढण्यात येते. या गावाचे पोकरगोटा हे देवस्थान आहे. ते लीजमधील जागेत होते, ते उठविण्यात आलेले आहे. जनतेसाठी ही कंपनी काहीही करत नाही. | सदरहू खाणी प्रकल्पात ७५% जास्त कामगार, कर्मचारी हे स्थानिक आहेत. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पोकरगोटा हनुमान मंदिराजवळ ब्लास्टींग करु नये म्हणून सूचना होती, तो डीजीएमएसचा No Blasting Zone आहे. त्यामुळे ३०० मीटर्स सोडून ब्लास्टींग करण्यात येते. गावातील देवस्थानासाठी निधि आवश्यक असल्यास त्याची तरतुद करण्यात येईल. |

३) **श्री सूरज गावंडे, राहणार-अडेगांव, तालुका- झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वृत्तपत्रात जी जाहिर सूचना प्रकाशित झाली, त्यात अडेगाव ग्रामपंचायतीचे नांव नाही. त्याचप्रमाणे स्थानिक लोकांनाही आजच्या जनसुनावणीची माहित नाही. माहिती असती तर येथे बहुसंख्येने स्थानिक उपस्थित राहिले असते. | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की २१/०५/२०२२ रोजी सरपंचमॅडम यांना सूचना देण्यात आलेली असून त्याची पोच मप्रनि मंडळ कार्यालयात आहे. आयोजक यांनी सांगितले की जनजागृती, दवंडी ह्या बाबी ग्रामपंचायत कार्यालयाने करण्याची सूचना देण्यात येतात |
| २) | कंपनीतून बाहेर जाणा-या गाड्या ह्या मर्यादेपेक्षा जास्त (Overload) माल घेऊन वेगाने बाहेर जातात. याची तक्रार कारखान्याकडे केलेली आहे. या वाहतुकीमुळे गावातील खूप लोग दगावले असून जखमीसुध्दा झालेले आहेत | कंपनीचा माल नेताना ट्रक्स ओव्हरलोड होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ३) | कंपनीतील राखेमुळे स्थानिकांना प्रचंड त्रास होत आहे. त्याचप्रमाणे खाणीला कुंपण लावलेले नाही. त्यामुळे जनावरे खड्ड्यात मरुन मेलेली आहेत. या खाणीचे दूषित पाणी भूगर्भात जाते, त्यामुळे बोअरविहीरीलाही दूषित पाणी येत असते. | सादरीकरणात डस्ट पोल्युशन कंट्रोल प्लॅन दाखविलेला आहे. आम्ही स्प्रिंकलर्स, वॉटर टँक वाढविणार आहोत. |
| ४) | कंपनीने कुठलीही झाडे लावलेली नाहीत. | रू. ११,५०,०००/- राखीव निधी हरित पट्टा विकासासाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस व गावात झाडे लावण्याचा प्रस्ताव आहे. २३०० झाडे लावण्यात येतील. |

**४) <u>श्री शंकर दादाजी झाडे, राहणार-अडेगांव, तालुका- झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदरहू जनसुनावणीची माहिती अडेगाव ग्रामपंचायतीस दिली होती की नाही याची माहिती त्वरित देण्यात यावी. जर दिली असेल, तर ग्रामपंचायतीच्या संबंधित अधिका-याने गावात दवंडी पिटली नाही म्हणून संबंधित अधिका-यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की २१/०५/२०२२ रोजी सरपंचमॅडम यांना सूचना देण्यात आलेली असून त्याची पोच मप्रनि मंडळ कार्यालयात आहे. आयोजक यांनी सांगितले की जनजागृती, दवंडी ह्या बाबी ग्रामपंचायत कार्यालयाने करण्याची सूचना देण्यात येतात. ग्रामपंचायत अधिका-यावर कारवाईच्या मागणीची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| २) | पोकरगोटा येथे हनुमानजींचे मंदिर आहे. तरी मंदिराच्या ३०० मीटर्सच्या परिसरात ब्लास्टींग व खाण नको. मात्र तेथे ब्लास्टींग होते व खाणसुध्दा आहे. यामुळे स्थानिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून आमचा या प्रकल्पाला विरोध आहे. दिवस-रात्र कंपनी चालू असते, त्यामुळे तेथील नागरिकांच्या जीविताला धोका आहे. गेले २०-२५ वर्षे खाण प्रकल्प चालू असून एकही रुपया गावाच्या विकासासाठी दिलेला नाही. त्यामुळे या प्रकल्पास माझा वैयक्तिक विरोध आहे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पोकरगोटा हनुमान मंदिराजवळ ब्लास्टींग करु नये म्हणून सूचना होती, तो डीजीएमएसचा No Blasting Zone आहे. त्यामुळे ३०० मीटर्स सोडूनच ब्लास्टींग करण्यात येते. गावातील देवस्थानासाठी निधि आवश्यक असल्यास त्याची तरतुद करण्यात येईल. |

५) श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी भारतातील पहिला वास्तववादी पर्यावरणवादी आहे की जो प्रकल्पाचे समर्थन करतो. आपल्या भारतात बेरोजगारी हे मोठे प्रदूषण आहे.पर्यावरण व आर्थिक विकास ह्यासाठी औद्योगिक विकासाची गरज आहे. भारतातील एनजीओज् हे प्रदूषणासाठी व आरोग्याच्या प्रश्नांसाठी उद्योगांना जबाबदार धरतात. भारतातील फक्त १५% लोकच उद्योग प्रदूषणाला तोंड देत आहेत. तरीही उरलेले ८५% लोकांनाही आरोग्याचे प्रश्न आहेत. तर पीकांवरिल कीटकनाशकेही प्रदूषण करतात.भारतात ४० कोटी तरुण, तरुणी हे रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत. भारत सरकार व विविध राज्ये दरवर्षी ५-६ लाख रोजगार उपलब्ध करु शकतात. तर दरवर्षी एक कोटी लोक हे रोजगारासाठी उपलब्ध होतात. फक्त औद्योगिक सेक्टर हे फक्त प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करुन देते. | सूचनेची नोंद घेण्यात येते. |
| २) | त्यांनी सूचना केली की प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींग अंमलात आणावे. प्रकल्पातील साहित्याची वाहतुक ही टार्पोलिनने बंद केलेल्या ट्रक्समधून करण्यात यावी. तर तेथे प्रदूषण होणार नाही. या दोन गोष्टींची काळजी केल्यास प्रदूषण होणार नाही | प्रकल्पात कंट्रोल डिले ब्लास्टींगच करण्यात येईल. त्यासाठी डिले डिटोनेटरचा वापर करण्यात येऊन अगदी मिलीसेकंदाचा फरक पडेल, ज्यामुळे कंपने/व्हायब्रेशन जाणार नाहीत. कंपने/व्हायब्रेशन तपासण्यासाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रकल्पातील साहित्याची वाहतुक ही टार्पोलिनने बंद केलेल्या ट्रक्समधून करण्यात येईल. |
| ३) | प्रकल्प व्यवस्थापनाने एक समन्वयक समिती (Co-ordination Committee) गठीत करावी. त्यात प्रकल्प व्यवस्थापन, सरंपच, स्थानिक स्वराज्य संस्था, प्रदूषण नियंत्रण अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा. समितीने आवश्यक असलेल्या सामाजिक योजना (Demand Oriented Work) | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की समन्वयक समितीचा उल्लेख हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील पॅरा ७.१ मध्ये करण्यात आलेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | राबवाव्यात. फक्त लक्ष्यपूर्ती सामाजिक योजना (Target Oriented Work) राबवू नयेत. सीएसआर निधी हा आवश्यक असलेल्या सामाजिक योजना (Demand Oriented Work) साठी खर्च करण्यात याव्यात. | |
| ४) | जरी खाणकाम उद्योगात हरितपट्टा विकसनाच्या काही मर्यादा आहेत. परिसरातील गावात व रस्याच्या दोन्ही बाजूस वृक्षारोपणाची गरज आहे. त्यात फळे असलेले वृक्ष व औषधी वनस्पती लावण्यात याव्यात. त्याची धुळ प्रदूषण प्रतिबंधासाठी उपयोग होईल व फळेही ग्रामस्थांना उपलब्ध होती | रस्त्याच्या दोन्ही बाजूस व हरित पट्टा विकासाबाबत सविस्तर सांगण्यात आलेले आहे. 2300 झाडे लावण्यात येतील |
| ५) | जरी खाणकाम उद्योगात हरितपट्टा विकसनाच्या काही मर्यादा आहेत. परिसरातील गावात व रस्याच्या दोन्ही बाजूस वृक्षारोपणाची गरज आहे. त्यात फळे असलेले वृक्ष व औषधी वनस्पती लावण्यात याव्यात. त्याची धुळ प्रदूषण प्रतिबंधासाठी उपयोग होईल व फळेही ग्रामस्थांना उपलब्ध होतील. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | ७५ हेक्टरमध्ये खाणकाम होणार आहे. तरी प्रकल्पात रेन वॉटर हार्वेस्टींग व साठवण करण्यात यावे. त्यामुळे परिसरातील भूजल पाण्याची पातळीत वाढ होईल. | रिचार्ज शाफ्ट व दोन खड्डे पावसाचे पाण्याच्या संवर्धनासाठी करण्यात आलेली आहेत. CGWB ने (Central Ground Water Board) रिचार्ज प्रस्ताव मंजूर केलेला आहे. |
| ७) | प्रकल्पाच्या १० कि.मी. परीघ क्षेत्रातील आरोग्य सद्यस्थितीबाबत सर्वेक्षण, स्थानिक पीकांच्या नमुन्याचे सर्वेक्षण, भूजल पातळीची सद्यस्थिती याचे सर्वेक्षण करण्यात यावे. त्याचा अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समावेश व्यवस्थापनाने करावा. | सूचनेचे स्वागत करण्यात येते. |
| ८) | खाणकाम ही भारत सरकारच्या अखत्यारीत येते. त्याचप्रमाणे आरोग्य व पर्यावरण हेही महत्वाचे घटक आहेत. ग्रामस्थांचे आरोग्य व सुरक्षितता हेही महत्वाचे आहे, म्हणून प्रकल्प उभारणीत स्थानिक ग्रामस्थांचे मत घेण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

६) **श्री मंगेश पाचभाई, राहणार-अडेगांव, तालुका- झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या परिसरातून खनिजाच्या माध्यमातून एवढा पैसा जातो, स्थानिक वारंवार विनंती करतात, जिल्हाधिकारी हे खनिज विकास समितीचे सचिव असतात, तर गावातील रॉयल्टीचा पैसा आम्हांला झगडून मिळत नाही. | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की श्री मंगेश पाचभाईंचा रॉयल्टीबाबत प्रश्न होता. नियमाप्रमाणे प्रत्येक टनाची रॉयल्टी ही जिल्हा खाण निधीत जमा होत आहे. |
| २) | आपण खाणीची जनसुनावणी आयोजित केलेली आहे. ते उत्पादन दुप्पट करत आहेत. दुप्पट करताना आजूबाजूचे जे शेतकरी आहेत, त्यांचाही मोबदला दुप्पट झाला पाहिजे, त्यांचे म्हणणे विचारात घ्यायला पाहिजे. | उत्पादन वाढीबरोबरच मोबदल्यातही वाढ करण्याचा मानस प्रकल्प व्यवस्थापनाचा आहे. |
| ३) | परिसरातील कुठल्याच कंपन्या आरोग्य शिबिर घेत नाहीत. येथील ४०-४५% स्थानिक लोकांना सदरहू प्रकल्पामुळे त्वचा खाजेचा आजार, किडनी स्टोन, प्रदूषणामुळे होणा-या आजारांचे प्रमाण येथे मोठ्या प्रमाणात आहेत. | आरोग्यशिबिराचे नियोजन करण्यात येईल. त्यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात येईल व ती माहिती अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सादर करण्यात येईल. |
| ४) | प्रकल्प विस्तारिकरणास समर्थन करताना स्थानिक शेतक-यांच्या समस्या, ग्रामविकास योजना, स्थानिकांना रोजगाराची संधि याबाबत ठोस कार्यवाही करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात येईल |

७) **श्री ज्ञानेश्वर मोतीराम चटप, राहणार-अडेगांव, तालुका- झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी शेती स.न. ६४२ असून ती प्रकल्पाला लागूनच आहे. त्यांनी रस्ता तयार करुन दिला, तो पावसाने पूर्ण खराब झालेला आहे. तो दुरुस्त करण्यात यावा. | रस्ता दुरुस्त करुन त्याचे खडीकरण करण्यात येईल. |
| २) | प्रकल्प व्यवस्थापनाने कंपनी कंपाऊडमधून खाणकामे कार्यरत करावीत. कंपाऊंडच्या बाहेरुन करु नये. | प्रकल्प कंपाऊंडमध्ये काम करत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३) | यावर्षी नुकसान भरपाई दिलेली नाही, तर करार करण्यात आला. जसे उत्पादन वाढते, त्याप्रमाणे नुकसानभरपाई वाढवावी. कारण दहा हजार रुपये वर्षाला जर शेतक-यांना देतील, तर त्याचा शेतक-याला काय फायदा होईल? आधिच हा जिल्हा हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा आहे. या प्रकल्पाचा शेतक-यांना काहीही फायदा होणार नाही. शेतकरी जगला, तरच देश जगेल. तरी शेतक-यांचा विचार सर्व बाबतीत करण्यात यावा | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की शेतीच्या नुकसान भरपाईचा विषय आहे. तर उत्पादनात वाढ होणार असल्याने मोबदल्यातही वाढ करण्याचा कंपनी प्रशासनाचा मानस आहे. |
| ४) | आमच्या शेतात बोअरवेल आहे.त्याची पाण्याची पातळी ही कमी होऊ शकते. तर आम्ही शेताला पाणी कसे द्यायचे. तरी सर्व शेतक-यांचे समाधान करण्यात यावे. | रिचार्ज शाफ्ट व दोन खड्डे पावसाचे पाण्याच्या संवर्धनासाठी करण्यात आलेली आहेत. CGWB ने (Central Ground Water Board) रिचार्ज प्रस्ताव मंजूर केलेला आहे. |

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही प्रश्न, सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

### ८) <u>श्री सीताराम पिंगे, राहणार-अडेगांव, तालुका- झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-</u>

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आतापर्यंत स्थानिक नागरिक व इतर गावातून आलेले ग्रामस्थ यांनी फक्त प्रकल्पाच्या समस्या सांगितल्या. तर या कंपनीचे फायदे काय आहेत याची सविस्तर माहिती कंपनी व्यवस्थापनाने आम्हांला द्यावी. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री पिंगे यांचा प्रश्न होता की कंपनीने फायदे सांगावेत. तर फायदे अनेक आहेत, जसे की राज्य सरकारला उत्पादनावर रॉयल्टी मिळेल. डी.एम.एफ.मध्ये १०% शासनास मिळेल. अधिसूचनेनुसार त्यातील ४०% बाधित क्षेत्रांना निधी मिळतो. हरित पट्ट्यात व रोजगारात वाढ होईल. त्याचप्रमाणे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ होईल. |

### ९) <u>श्री विनोद तातेड, राहणार-अडेगांव, तालुका- झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-</u>

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | माझी विनंती आहे की ही डोलोमाईट कंपनी असून यास संलग्न अशी गट्टीमाईन कंपनी | सादरीकरणात डस्ट पोल्युशन कंट्रोल प्लॅन दाखविलेला आहे. आम्ही स्प्रिंकलर्स, वॉटर टॅंक |

| | | |
|---|---|---|
| | आहे. कंपनीचे नियमाप्रमाणे कामाचे तास असतात, पण येथे २४ तास कंपनीतील ट्रक्स माल घेऊन जात असतात. संध्याकाळी आपण रस्त्यावर आल्यास आपणास रस्ता दिसत नाही एवढी राख पडलेली असते. तरी या कंपनीच्या सततच्या वाहतुकीवर नियंत्रण आणण्यात यावे. रस्त्यावर सतत कंपनीचा माल पडलेला असतो, त्याबाबत कठोर निर्णय घेण्यात यावा. कंपनीतील माल, राख पडल्यामुळे जे अपघात होत आहेत, त्याची जबाबदारी ही कंपनीने घ्यावी.<br>तरी नियमाप्रमाणे कंपनी कार्यान्वित व बंद ठेवण्यात यावी, वाहतुक ही नियमाप्रमाणे करण्यात यावी व अपघात झाल्यास त्याचा मोबदला कंपनीने द्यावा. | वाढविणार आहोत. आम्ही ११,५०,००० राखीव निधी हरित पट्टा विकासासाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे.<br>त्यांनी पुढे सांगितले की वाहतुक ही बंद ट्रक्समधूनच करण्यात येईल. |

## १०) श्री आशीश फुलसंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य, यवतमाळ:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | ही कंपनी अडेगाव ग्रामपंचायतीत कार्यरत आहे. तर अडेगांवातील लोकांना कंपनीत रोजगाराची संधि देण्यात यावी. | कार्यरत प्रकल्पात ७५% कामगार, कर्मचारी हे स्थानिकच आहेत. |
| २) | येथे जरी इतर खाणी आहेत, तरी अडेगाव वडकीपुराहून ज्या गाड्या जातात, त्या ओव्हरलोड असतात. सदरहू रस्ता हा जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येत असून त्यास १५ टन वाहतुकीची मर्यादा असते. तरी पर्यावरण जनसुनावणी समितीस व शासनास सदरहू रस्त्याची क्षमता वाढविण्यासाठी तो राज्य महामार्ग विभागाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया त्वरित करण्याची मागणी करण्यात येते. | कंपनीच्या गाड्या ओव्हरलोड होणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल. रस्ता महामार्ग विभागास हस्तातरित करण्याचा विषय हा जिल्हा प्रशासनाच्या अखत्यारित येतो. |
| ३) | कंपनीतून उडणा-या धुळीमुळे परिसरातील शेतक-यांच्या पीकांचे नुकसान होते. येथे शेतक-यांनी सांगितले की फक्त दहा हजार रुपये वार्षिक मोबदला दिला जातो. तरी तो | सादरीकरणात डस्ट पोल्युशन कंट्रोल प्लॅन दाखविलेला आहे. आम्ही स्प्रिंकलर्स, वॉटर टँक वाढविणार आहोत. आम्ही रू. ११,५०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | त्वरित वाढवून देण्यात यावा. यातही या गुंडेवार माईन्सचा जास्त प्रश्न आहे. भविष्यातील येथील औद्योगिक प्रगती लक्षात घेता येते प्रदूषणाचा प्रश्न हा आतापेक्षा गंभीर बनू शकतो. त्यासाठी रस्त्यावर पाणी मारणे व माल न सांडणे या कृती करण्यात यावा. | राखीव निधी हरित पट्टा विकासासाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे.<br>पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की उत्पादन वाढीबरोबरच मोबदला वाढही करण्यात येणार आहे. |
| ४) | या परिसरातील खाणीतून जी धुळ बाहेर पडते, ती लोकांच्या आरोग्यावर, पीकांवर दुष्परिणाम करणारी आहे. तरी म.प्र.नि. मंडळ व इतर शासकीय विभागांनी पारित केलेल्या सर्व सूचना, अटी व शर्तीचे कंपनीने तंतोतं पालन करावे. मप्रनि मंडळाने परिसरातील प्रदूषणावर काटेकोर लक्ष ठेऊन त्याबाबत कारवाई करावी. | सूचनेची नोंद घेण्यात येते. |
| ५) | कंपनीच्या डस्टमुळे परिसरात दम्याचे, त्वचा रोगांचे प्रमाण वाढलेले आहे. तरी कंपनीने वेळोवेळी आरोग्यशिबिरे आयोजित करावित व बाधितांना औषधोपचार पुरविण्यात यावा. | आरोग्यशिबिरे विशिष्ट कालावधीत आयोजित करण्याची योजना तयार करण्यात येईल. त्यासाठी आर्थिक तरतुद करण्यात येईल. |

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांच्या सूचना,आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

**११) <u>सौ. सीमा दत्ता लालसरे, सरपंच, अडेगाव ग्रामपंचायत, तालुका- झरी जामणी, जिल्हा- यवतमाळः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीकडून वेळोवेळी विकास कामांना मदत होते. मात्र कंपनीने विशिष्ट कालावधीनंतर आरोग्य शिबिरे आयोजित करावीत. | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आरोग्य शिबिराबाबत वर्षातून दोन वेळा आयोजित करण्याचे प्रयोजन करण्यात येईल. |
| २) | परिसरात प्रदूषणाचे प्रमाण वाढलेले आहे. त्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाने लक्ष ठेवावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | परिसरात अनेक होतकरु तरुण-तरुणी आहेत. त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांना मदत करण्यात यावी. | विद्यार्थ्यांसाठी आम्ही पुर्वी केलेले आहे. ते चालू ठेवण्यात येईल |
| ४) | स्थानिक शेतक-यांचे नुकसान झाल्यास मोबदल्यात वाढ केली पाहिजे. | शेतक-यांना मोबदला वाढविण्याचा आमचा मानस आहे. |

**१२) श्री सागर माशिलकर, अडेगाव, तालुका-झरीजामणी,जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे सर्व स्थानिक आपण मोबदला किती प्रमाणात देणार याबाबत ऐकण्यास उत्सुक आहेत. तरी याबाबत माहिती देण्यात यावी. येथे सर्व स्थानिक हे मोबदला रक्कम बाबत ऐकण्यास आलेले आहेत. | अध्यक्ष, यांनी सांगितले की बैठकीत मोबदला किती व कसा मिळेल याबाबत विचारणा करण्यात आलेली होती. हा विषय जरी ह्या जनसुनावणीचा विषय नसला तरी तो सर्वांच्या जिव्हाळाचा विषय असल्याने त्यांनी सांगितले की नियमाप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापनास शेतक-यांना मोबदला द्याव्याच लागेल. जर तसे मिळाले नाही, तर आपण जिल्हाधिकारी कार्यालयास अर्ज करु शकता. आपली सुनावणी होईल व जर प्रकल्प व्यवस्थापनाने नियमाप्रमाणे मोबदला दिला नाही तर त्यांना देण्यास भाग पाडले जाईल ह्याची खात्री देण्यात येते. |

**१३) श्री सुमीत नवनाथ क्षिरसागर, अडेगाव, तालुका-झरीजामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ७५% रोजगार वाढवून मिळणार आहेत. गावातील विद्यार्थी सारखे येऊन भेटत असतात. तर याबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्यात. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात ७५% रोजगार हा स्थानिकच आहे. उत्पादन वाढीमुळे जेवढे अतिरिक्त कर्मचारी लागतील, त्यातील ७५% कामगार हे स्थानिक असतील. |

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांच्या सूचना,आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणाताच प्रतिसाद नव्हता. आयोजक यांनी प्रकल्प व्यवस्थापनांना उपस्थित सूचना, आक्षेपांना उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की उपस्थित तांत्रिक व शास्त्रीय मुद्द्यांवर ते उत्तर देतील व ज्या काही प्रशासकीय बाबी असतील, त्यावर कंपनी प्रशासनातर्फे उत्तर देण्यात येईल:-

१) प्रकल्पात कंट्रोल डिले ब्लास्टींगच करण्यात येईल. त्यासाठी डिले डिटोनेटरचा वापर करण्यात येऊन अगदी मिलीसेकंदाचा फरक पडेल, ज्यामुळे कंपने/व्हायब्रेशन जाणार नाहीत. कंपने/व्हायब्रेशन तपासण्यासाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्यात येईल.

२) प्रकल्प व्यवस्थापन लीज वाढवतही नाही व कमी करत नाही. अस्तित्वात असलेल्या क्षेत्रावरच उत्पादन क्षमता वाढविणार आहोत.

३) शेतीच्या नुकसान भरपाईचा विषय आहे. तर उत्पादनात वाढ होणार असल्याने मोबदल्यातही वाढ करण्याचा कंपनी प्रशासनाचा मानस आहे.

४) श्री संदीप आसोदकर यांनी डस्ट प्रदूषणाबाबत प्रश्न विचारला. सादरीकरणात डस्ट पोल्युशन कंट्रोल प्लॅन दाखविलेला आहे. आम्ही स्प्रिंकलर्स, वॉटर टँक वाढविणार आहोत. आम्ही रू. ११,५०,०००/- राखीव निधी हरित पट्टा विकासासाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस व गावात झाडे लावण्याचा प्रस्ताव आहे. २३०० झाडे लावण्यात येतील.

५) श्री आसोदकर यांनी भोई समाजासाठी जो प्रश्न विचारला, त्याबाबत उत्तर आहे की मत्स्यपालनासाठी अंदाजपत्रात तरतुद करण्यात येत आहे. जर येथील खाणीतील खड्ड्यात जर जमले नाही, तर गावातील तलावात त्यांना प्रोत्साहन करण्यात येईल. प्रकल्प व्यवस्थापन फक्त आर्थिक भार स्विकारेल, मात्र बाकी सर्व इतर प्रशासकीय बाबी या त्या भोई समाज सोसायटी यांनी करायच्या आहेत.

६) सदरहू खाणी प्रकल्पात ७५% जास्त कामगार, कर्मचारी हे स्थानिक आहेत.

७) श्री पानघाटे यांनी कंपनीने वडकी - अडेगाव हा रस्ता सिमेंटचा करुन देण्याची मागणी केली. तर कच्चा रस्ता तयार करुन देण्यात येईल, मात्र पक्का रस्ता विकसित करण्याचा विचार जिल्हा प्रशासनाने जिल्हा खनिज निधीतून करावा, कारण आमची उत्पादनवाढ हे सिमेंटचा रस्ता विकसित करण्याऐवढी नाही. मात्र त्यास सहकार्य निश्चितच प्रकल्प करेल.

८) कंपनीचा माल नेताना ट्रक्स ओव्हरलोड होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

९) हनुमान मंदिराजवळ ब्लास्टींग करु नये म्हणून सूचना होती, तो डीजीएमएसचा No Blasting Zone आहे. त्यामुळे ३०० मीटर्स सोडूनच ब्लास्टींग करण्यात येते. गावातील देवस्थानासाठी निधि आवश्यक असल्यास त्याची तरतुद करण्यात येईल.

१०) प्रकल्प सल्लागार यांनी श्री सुनंदा रेड्डी यांचे प्रकल्पास पाठिंबा दिल्याबद्द आभार मानले. त्यांनी सांगितली की प्रकल्पात कंट्रोल डिले ब्लास्टींगच करण्यात येईल. वाहतुकीचे ट्रक्स हे बंधिस्त असतील. रस्त्याच्या दोन्ही बाजूस व हरित पट्टा विकासाबाबत सविस्तर सांगण्यात आलेले आहे. २३०० झाडे लावण्यात येतील. समन्वयक समितीचा उल्लेख हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील पॅरा ७.१ मध्ये करण्यात आलेला आहे. रिचार्ज शाफ्ट व दोन खड्डे पावसाचे पाण्याच्या संवर्धनासाठी करण्यात आलेली आहेत. CGWB ने रिचार्ज प्रस्ताव मंजूर केलेला आहे.

११) श्री मंगेश पाचभाईंचा रॉयल्टीबाबत प्रश्न होता. नियमाप्रमाणे प्रत्येक टनाची रॉयल्टी ही जिल्हा खाण निधीत जमा होत आहे. उत्पादन वाढीबरोबरच मोबदल्यातही वाढ करण्याचा मानस प्रकल्प व्यवस्थापनाचा आहे.

१२) श्री पिंगे यांचा प्रश्न होता की कंपनीने फायदे सांगावेत. तर फायदे अनेक आहेत, जसे की राज्य सरकारला उत्पादनावर रॉयल्टी मिळेल. डी.एम.एफ.मध्ये १०% शासनास मिळेल. अधिसूचनेनुसार त्यातील ४०% बाधित क्षेत्रांना निधी मिळतो. हरित पट्ट्यात व रोजगारात वाढ होईल. त्याचप्रमाणे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

१३) श्री आशीश फुलसंगे यांनी रस्त्याबाबत प्रश्न विचारला, त्यास उत्तर देण्यात आलेले आहे. प्रदूषणाबाबत सर्व उपाय योजना सांगण्यात आलेल्या आहेत. स्थानिक रोजगार हा ७५% आहे. ओव्हर लोडिंगबाबत प्रकल्प व्यवस्थापन कडक संदेश संबंधित ट्रक्स संस्थेस पाठवेल.

१४) सरपंच, अडेगाव सौ. लालसरेमॅडम यांनी आरोग्यशिबिराबाबत वर्षातून दोन वेळा आयोजित करण्याचे प्रयोजन करण्यात येईल. विद्यार्थ्यांसाठी आम्ही पुर्वी केलेले आहे. ते चालू ठेवण्यात येईल. शेतक-यांना मोबदला वाढविण्याचा आमचा मानस आहे.

आयोजक यांनी सांगितले की २१/०५/२०२२ ला सरपंच मॅडम सूचना देण्यात आलेली असून त्याची पोच मप्रनि मंडळ कार्यालयात आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात ७५% रोजगार हा स्थानिकच आहे. उत्पादन वाढीमुळे जेवढे अतिरिक्त कर्मचारी लागतील, त्यातील ७५% कामगार हे स्थानिक असतील.

काही उपस्थितांनी सीएसआर निधीतून अडेगावासाठी किती व कोठे खर्च केलेला आहे याचे स्पष्टीकरण देण्यास सांगितले.

पर्यावरण सल्लागार यांनी सागितले की गावाला काही निधी देण्यात आलेला होता. गावात कबड्डी स्पर्धा झाली, त्यास पुरस्कार पुरस्कृत करण्यात आलेला होता. करोना काळात बेड्स, वॉटर टँकर्स, सॅनिटायझर पुरविण्यात आलेले होते. क्रिकेट महोत्सवास निधी उपलब्ध करण्यात आलेला होता. जे गावातील विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले, त्यांना कारखान्यात बोलावून सत्कार करण्यात आलेला होता. येणा-या रस्त्यावर झाडे लावण्यात आलेली आहेत.

१९९८ पासून गावाच्या स्थानिक विकासासाठी काय करण्यात आले?

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जरी संबंधित विषय ह्या बैठकीचा नाही, तरीही तो हिशोब सादर करण्याची सूचना करण्यात येईल.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आज आपण प्रकल्प प्रवर्तक श्रीमती दिपाली गोपाळ गुंडावार यांच्या अडेगांव लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ७९५, अडेगांव, तालुका-झरी झामणी, जिल्हा-यवतमाळ यांच्या वाढीव उत्पादन क्षमता ५,९४,७१२-६,००,००० टन/वर्ष (डोलोमाईट-४,५४,४६० टन/वर्ष + लाईमस्टोन-१,४०,२५२ टन/वर्ष) ते १२,००,००० टन/वर्ष (डोलोमाईट-८४०००० टन/वर्ष + लाईमस्टोन-३६०००० टन/वर्ष) व प्रकल्प क्षेत्र ३०.० हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी जमलेलो आहोत. येथे गावाचे प्रथम नागरिक म्हणजे सरपंच, माजी जिल्हा परिषद सदस्य, परिसरातील गावातील ग्रामस्थ, शेतकरी बांधव उपस्थित आहेत.

अध्यक्ष यांनी सर्व सूचना, आक्षेप यांची परामर्ष घेतला. त्यांनी सांगितले की काही लेखी सूचनासुध्दा येथे व म.प्र.नि.मंडळ कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

अध्यक्ष यांनी सांगितले की-

१) **श्री दीनकर पानघाटे, अडेगाव** यांनी सविस्तर माहिती दिली. त्यात त्यांनी ब्लास्टींगच्या धोक्यापासून 1998 पासूनच्या लीजमधील सर्व समस्यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. जनावरांच्या चा-यापासून स्थानिकांना रोजगार व गावासाठी विकास निधी या बाबीं सांगितल्या. वडकी ते अडेगाव रस्ता प्रकल्प प्रवर्तकांनी सिमेंटचा करण्याची त्यांनी मागणी केली.

२) **श्री संदिप आसुदकर, अडेगाव** यांनी डस्टमुळे होणारा श्वसनाचा आजार, तलावातील मत्स्य बीज, भोई समाजाबाबत कार्यवाही याचा उल्लेख केलेला आहे. वडकी ते आडगाव रस्त्याबाबत त्यांनीही सूचना मांडल्या..

३) **श्री सुरज गांवडे, अडेगाव** यांनी त्याचप्रमाणे जनावरांचे अपघात होतात, झाडे लावली नाहीत, स्थानिकांना रोजगार, बोअरवेलचे पाणी दूषित होते हे मुद्दे मांडले.

४) **श्री दिनकर दादाजी झाडे, अडेगाव** यांनी प्रकल्पाचा पर्यावरणीय दस्तावेज वेळेत उपलब्ध केला नाही, म्हणून ग्रामपंचायतीच्या सचिवांवर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी केली. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच पोकरगोटा येथे हनुमानजींचे मंदिर आहे, तेथे 300 मीटर्सपर्यंत ब्लास्टींग न करण्याची सूचना केलेली आहे.

५) **श्री सुनंदा रेड्डी यांनी** प्रकल्पास पाठिंबा दर्शविलेला आहे. पर्यावरणविषयक व रोजगारविषयक प्रश्न मार्गी लावण्याच्या त्यांनी सूचना केलेल्या आहेत. आरोग्यशिबिराबाबत, हरितपट्टा विकासाबाबत,ब्लास्टींग बाबत सूचना केलेल्या आहेत.

६) **श्री मंगेश पाचभाई, अडेगाव यांनी** रॉयल्टीचा पैसा ग्रामपंचायतीस मिळाला पाहिजे अशी मागणी केली. मोबदला वाढवून द्यावा, आरोग्यशिबिरे याबाबत सूचना केल्या.

७) **श्री ज्ञानेश्वर मोतीराम चटप, अडेगाव यांनी** उत्पादन दुप्पट वाढले तर मोबदलाही दुप्पट वाढला पाहिजे, स्थानिकांना रोजगार या मुद्द्यांचा उल्लेख केलेला आहे.

८) **श्री सीताराम पिंगे, अडेगाव यांनी** प्रकल्पामुळे काय फायदे होतील याची माहिती देण्याची मागणी केली.

९) **श्री विनोद तातेड, अडेगाव यांनी** मायनिंग जसा कालावधी ठरविला असेल त्यानुसारच ट्रक वाहतुकीची सूचना केली.

१०) **श्री आशिष फुलसुंगे यांनीसुध्दा** वडकी अडेगाव रस्त्यास राज्य महामार्गाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केली. ही चांगली सूचना त्यांनी केलेली आहे. त्यांनी मोबदला, प्रदूषण, स्थानिक रोजगार याबाबत सूचना केल्या.

११) **सरपंच, अडेगाव, लालसरे यांनी** गावकरी म्हणून कंपनीस पाठिंबा असला तरी आरोग्यशिबिरे, होतकरु तरुण-तरुणींना प्रोत्साहन करण्याची मागणी केली.

१२) **श्री सागर माशिलकर यांनी** मोबदला स्थानिक शेतक-यांना कशाप्रकारे देण्यात येईल याबाबत विचारणा केली.

१३) **सुमीत क्षिरसागर यांनी** रोजगार वाढविला पाहिजे अशी मागणी केली,

अध्यक्ष यांनी सांगितले की उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधि देण्यात आली. बैठकीत प्राप्त लेखी सूचना ह्या आयोजक यांना हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. त्याची उत्तरे प्राप्त झाल्यावर त्या अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात याव्यात.

अध्यक्ष यांनी लेखी सूचना/आक्षेप यांची नावे वाचली

१) ग्रीन सर्कल सोसायटी,
२) सेव्ह एनिमल एन्व्हॉरमेंट सोसायटी
३) अडेगाव रहिवाशी आशिश झाडे
४)पॉवर ऑफ नेचर डेव्हलपमेट सोसायटी
५)ट्रु व्हिजन फॉर एन्व्हॉरमेंट एन्ड रुरल डेव्हलपमेट सोसायटी
६) अर्थ ग्रीन डेव्हलपमेट सोसायटी
७)संकल्प स्वच्छत समता
८)माथारु श्री चॅरिटेबल ट्रस्ट एन्ड ओल्ड एज होम
९) संकल्पशा एन्व्हॉरमेंट सोसायटी

अध्यक्ष, यांनी सांगितले की बैठकीत मोबदला किती व कसा मिळेल याबाबत विचारणा करण्यात आलेली होती. हा विषय जरी ह्या जनसुनावणीचा विषय नसला तरी तो सर्वांच्या जिव्हाळाचा विषय असल्याने त्यांनी सांगितले की नियमाप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापनास शेतक-यांना मोबदला द्याव्याच लागेल. जर तसे मिळाले नाही, तर आपण जिल्हाधिकारी कार्यालयास अर्ज करु शकता. आपली सुनावणी होईल व जर प्रकल्प व्यवस्थापनाने नियमाप्रमाणे मोबदला दिला नाही तर त्यांना देण्यास भाग पाडले जाईल ह्याची खात्री देण्यात येते.

त्यांनी प्रकल्प व्यवस्थापनास स्थानिक पातळीवर सुसंवाद (Harmony) ठेवण्याची सूचना केली.

अध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ११ सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(अतुल सातफळे)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(अ. मा. करे)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(ललितकुमार वऱ्हाडे)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ |